# मेट्रो-३ मार्गावरील १८ वा बोगदा पूर्ण

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. २९ : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो- ३ मार्गिकेतील १८ व्या बोगद्याचे काम शुक्रवारी (ता. २७) पूर्ण झाले. वैनगंगा- १ या टीबीएमद्वारे (टनेल बोअरिंग मशीन) कुलाबा दिशेकडील पाली ग्राऊंड ते सीप्झ या भागातील १ हजार ९८९ मीटर भुयारीकरणाचा टप्पा पूर्ण करण्यात आला. वैतरणा- १ नंतर मेट्रो- ३ मार्गिकेच्या भुयारीकरणाचे काम पूर्ण करणारे वैनगंगा- १ हे दुसरे टीबीएम आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे कुलाबा-वांद्रे-सीप्झ या संपूर्ण मार्गिकेच्या एकूण ५५ किलोमीटर भुयारीकरणाचे काम टीबीएमद्वारे सुरू आहे. आतापर्यंत ३२ किलोमीटर मार्गिकेचे काम पूर्ण झाले असून, भुयारीकरणाचे काम १७ टीबीएमद्वारे सुरू आहे. कुलाबा-वांद्रे-सीप्झ या पहिल्या भुयारी मेट्रो-३ मार्गातील आझाद मैदान ते मुंबई सेंट्रलपर्यंत ३.८१२४ किलोमीटर भुयारीकरण गेल्या महिन्यातच पूर्ण झाले. त्यामुळे

## खोदकामासाठी शाफ्ट

**टीबीएम जमिनीखाली नेण्यासाठी अनेक ठिकाणी विवरे (शाफ्ट) तयार करण्यात आली. कफ परेड, इरॉस चित्रपटगृह, आझाद मैदान, शीव, सिद्धिविनायक मंदिर, नया नगर, बीकेसी, विद्यानगरी, पाली मैदान, सारिपुत, सहार रोड आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ टी-२ येथे हे शाफ्ट आहेत.**

'डाऊनलाईन' बोगदा पूर्ण करणारी मेट्रो-३ प्रकल्पातील वैतरणा-१ ही पहिली टीबीएम ठरली. केवळ २० महिन्यांत वैतारणा-१ ने हा महत्त्वपूर्ण पल्ला गाठला.

या प्रकल्पाचे काम एकूण सात भागांत होणार असून, सिद्धिविनायक मंदिर ते धारावी हा सर्वांत मोठा टप्पा आहे. यात ११.०२ किलोमीटरच्या भुयारीकरणापैकी ६.८९ किलोमीटर भुयारीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. कफ परेड ते सीएसएमटी या पहिल्या पॅकेजमधील ५.८९ किलोमीटरपैकी ३.२१ किलोमीटरचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे.